Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# गजानन महाराज संस्थान येथील व्यवस्थापन: एक अभ्यास

**अश्विनी कायंदे**
संशोधक विद्यार्थीनी, भूगोल

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र ही भूमी साधू संत व मंदिरे यासाठी ओळखले जाते. विदर्भातील गजानन महाराज हे शेगाव जिल्ह्यातील, बुलढाणा, महाराष्ट्रातील एक संत आहेत व या ठिकाणी असलेले संत गजानन महाराज संस्थान ही विदर्भाची सर्वात मोठी अध्यात्मिक संस्था आहे. तीर्थक्षेत्र म्हणून शेगावने नावलौकिक मिळवला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात गजानन महाराजांचे मंदिर पाहायला मिळते. असे असले तरीही गजानन महाराजांच्या भक्तांसाठी शेगावच्या मंदिराचे विशेष महत्त्व आहे. गजानन महाराजाचे आशीर्वाद घेण्यासाठी हजारो भाविक शेगावला येत असतात.

**शेगाव येथील गजानन महाराज संस्थानातील व्यवस्थापन:**

विदर्भातील अनेक अध्यात्मिक संस्थांनापैकी गजानन महाराज संस्थान हे विदर्भातील सर्वात मोठे मंदिर ट्रस्ट असून शिस्तबद्ध, प्रामाणिक, आध्यात्मिक, वैद्यकीय आणि सामाजिक कार्यांसाठी सुप्रसिद्ध आहे. या मंदिरातील व्यवस्थापन हे व्यवस्थापनाचा आदर्श नमुना आहे. मंदिरात सेवेकरी म्हणून काम करू इच्छिणाऱ्या भक्तांची प्रतीक्षा यादी असून त्यासाठी काही वर्षेसुद्धा तिष्ठत राहावे लागते. मंदिराचे व्यवस्थापन प्रामाणिकपणा, अत्यंत साधेपणा आणि यात्रेकरू अथवा वारकरी यांच्याविषयी आदर बाळगणारे आहे. सेवाधारी भक्त आपल्या गुरूप्रेमासाठी नम्रपणे स्वयंसेवक म्हणून काम करतात. आसपासच्या खेड्यापाड्यातून तीसच्या गटांमध्ये स्वयंसेवकांची नोंदणी करून एक महिना क्रमावर्तन तत्त्वावर, निस्वार्थीपणे विनामूल्य सेवा प्रदान करतात. आदर्श व्यवस्थापन, पारदर्शकता, विश्वसनीयता या शब्दांच्या नव्या व्याख्या शेगाव संस्थानाच्या आदर्शन व्यवस्थापनातून प्रत्यक्ष अनुभवयास येतात.

श्री गजानन महाराज संस्थान हे शेगावला दर्शनासाठी येणाऱ्या यात्रेकरूंची अथवा वारकऱ्यांची उत्तम काळजी घेते व त्यासाठी ते प्रसिद्ध आहे. तीन दिवसांपर्यंत निवासाची व्यवस्था ही संस्थानामार्फत केली जाते. श्री गजानन महाराजांच्या भक्तांसाठी भक्तनिवास, आनंदसागर-संकुल, विसावा इत्यादी ठिकाणी राहण्याची सोय, स्वच्छ सुविधा आणि भोजन माफक दरामध्ये पुरविली जाते. सकाळी ९ पासून ते रात्री ९ पर्यंत रेल्वे

स्टेशनहून मंदिरापर्यंत बसने मोफत वाहतूक केली जाते तर मंदिर परिसरात भक्तांना दररोज बारीमध्ये निशुल्क महाप्रसाद दिला जातो.

८ सप्टेंबर १९१० रोजी महाराजांनी समाधी घेतली. महाराजांनी समाधी घेतली त्या ठिकाणी त्यांचे मंदिर बांधण्यात आले. संत गजानन महाराज संस्थान संपूर्ण विदर्भातील सर्वात मोठी संस्था आहे आणि ही संस्था 'विदर्भाचे पंढरपूर' म्हणूनही गणली जाते. संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक येथे येतात.

गजानन महाराज संस्थानातर्फे आनंद सागर नावाचे हे ठिकाण अतिशय सुंदर फिरण्याचे ठिकाण विकसित करण्यात आलेले आहे. आरामात फिरल्यास ५ ते ७ तास लागतात. या ठिकाणी ठराविक अंतरावर चहा नास्ता साठी कॅन्टीन (माफक दरात) ची सोय देखील आहे. मंदिर ते आनंद सागर येथे जाण्यासाठी संस्थेच्या बसेस सुविधा उपलब्ध आहे.





**गजानन महाराज संस्थान व्यवस्थापनात शिवशंकरभाऊ पाटील यांचे योगदानः**

व्यवस्थापन हा फक्त चर्चेचा विषय नसुन आचरणाचा विषय आहे हे गजानन महाराज संस्थानचे विश्‍वस्त शिवशंकरभाऊ पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. गजानन महाराजांविषयी त्यांना नितांत प्रेम होते. गजानन महाराजांविषयी हृदयातील निस्सीम श्रद्धा आणि मनातील सेवाभाव ह्याच्या भरवश्यावर नियोजनबद्ध आणि गुणवत्तेवर भर देत या संस्थानातील काम चालते. मा. शिवशंकरभाऊ पाटील हयात असेपर्यंत त्यांनी हे सेवाकार्य अखंड चालु ठेवले आणि ते पुढेही नेटाने चालु आहे. शिवशंकरभाऊ पाटील हे मंदिर, जेवणाचे हॉल, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, आनंद सागर प्रकल्प आणि या संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या इतर अनेक संस्थांच्या प्रशासन आणि व्यवस्थापनासाठी ओळखले जातात. इथे सेवेकरी आहेत आणि पगारी नोकर पण आहेत. गजानन महाराज संस्थानामध्ये पडेल ते काम करण्यासाठी वेटिंग लिस्ट असते हे इथले वेगळे वैशिष्ट्ये. चप्पल व्यवस्थापक, बागकाम, स्वछताकर्मी, हिशोबनीस, स्वयंपाकी, वैद्यकीय सेवा अशा विविध सेवा देण्यासाठी या संस्थानात नोंदणी करावी लागते आणि अनेक दिवस वाट पाहून सेवा करावी लागते. कधीकधी तर सेवा करण्यासाठी वर्ष दोन वर्षे सहज लागतात. शिवशंकर भाऊ पाटील हे मुळातच निस्वार्थी व्यक्तीमत्व होते.





शिवशंकर भाऊ संस्थानचा चहा पण पीत नव्हते इतका निस्वार्थ भाव त्यांच्या ठायी होता. त्यामुळे सगळीच टीम त्याच निर्मोही व निस्वार्थ भावनेने अजूनही काम करते व पुढेही करत राहिल. गजानन महाराज संस्थानामार्फत विविध क्षेत्रात सेवाकार्य चालते. वारकरी प्रशिक्षणापासून ते फिरत्या दवाखान्या पर्यंत आणि सातपुड्याच्या आदिवासी भागातील सेवाकार्यांपासून अभियांत्रिकी महाविद्यालया पर्यंत वेगवेगळे ४२ सेवा प्रकल्प अव्याहतपणे व कुठलीही तक्रार व संघर्षविरहीत कार्यरत आहेत.

संस्थानातर्फे चालविल्या जाणाऱ्या विविध संस्थांपैकी अभियांत्रिकी महाविद्यालय सर्वोत्तम संस्थांपैकी एक आहे तसेच आनंद सागर प्रकल्प, जो ७५० एकर जागेत पसरलेला आहे जेथे सर्व सुविधा माफत दरात आहेत. येथील मंदिर स्वच्छता आणि शुद्ध वातावरणासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. देवळा जवळ रूम भक्तांसाठी भक्त निवास (इमारत क्रमांक २, ३, ४, ५) उपलब्ध आहे जेथे फक्त रु.१५०, १७५ ,३०० ,४००, ६००, ९०० अशी माफक दर आकारुन निवास सेवा पुरविली जाते. पैसा हे उद्दीष्ट नसून ते साधन आहे, त्याव्दारे समाजाची सेवा झाली पाहिजे या महाराजांच्या शिकवणुकीनुसार बांधकामे,अन्नदान,सेवाकार्य आदी चालतात. पैसा येत राहतो अन काम चालूच राहते. गजानन महाराज संस्थानाचे कोणतेही काम कधीही पैशासाठी थांबले नाही हे शिवशंकर भाऊ पाटील अवर्जुन सांगत. संस्थानाच्या परंपरेप्रमाणे दररोज आवक जावकचा हिशोब आणि शिल्लक रोज फलकावर जाहीर रित्या लिहिली जात असते जे संस्थानाच्या पारदर्शकतेचे उत्तम उदाहरण आहे.

एका निष्काम कर्मयोग्याप्रमाणे जीवन व्यतीत केलेल्या शिवशंकर पाटील यांची गुणवैशिष्ट्ये किंवा त्यांच्या कार्याचा विस्तार शब्दांत वर्णन करणे कठीण आहे. ऋषीतुल्य व्यक्तिमत्व, वारकरी विचारधारेचे पाईक, साधी रहाणी आणि समाजकल्याणाची विचारसरणी यामुळे त्यांच्या हातून जीवनभर समाजसेवा होत गेली. त्यांच्या कार्य व त्यागाच्या पार्श्वभूमीवर त्यांना 'शेगावीचा राणा' म्हणून गौरवले जाते. मा. शिवशंकर भाऊ पाटील सर्वांसाठी आदर्श आणि कौतुकास पात्र होते. गजानन संस्थेच्या अनेक संस्था अमरावती विद्यापीठाशी संलग्न आहेत. शिवशंकरभाऊ पाटील यांच्या कार्याची नोंद अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापिठाने घेतली आहे. व्यवस्थापनाचा एक आगळावेगळा नमुना म्हणून 'व्यवस्थापन' हा विषय शिकवणाऱ्या हॉवर्ड विद्यापिठात शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानच्या व्यवस्थापनाचा अभ्यास केला जातो यावरुन गजानन महाराज शेगाव संस्थानाच्या सुनियोजित व्यवस्थापनाच्या गुणवत्तेशी कल्पना येते.

श्री संत गजानन महाराज शेगाव संस्थानचे विश्वस्त शिवशंकर भाऊ पाटील यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी सन २०२१ मध्ये वृद्धापकाळाने शेगाव येथे यांचं निधन झाले.

**संदर्भः**

१) गजानन महाराज संस्थान संकेतस्थळ

२) बुलढाणा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०२०

३) दै. लोकमत.